**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः01.05.2026** **वारःशुक्रवार**

---

1. व्यापार, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक भागिदारी वाढवून भारताच्या जागतिक सहभागाला बळकटी देण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन
2. महाराष्ट्र दिनानिमित्त आज महाराष्ट्रात विविध कार्यक्रमांचं आयोजन, गुजरातमध्येही स्थापना दिनानिमित्त कार्यक्रम
3. देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभेच्छा
4. ऑनलाइन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन नियम 2026 आजपासून लागू, ऑनलाइन पैशांशी संबंधित खेळांवर पूर्ण बंदीसह इतर नियमांची अंमलबजावणी होणार आणि
5. आयपीएलमध्ये विराट कोहलीचा विक्रम, आठ हजारपेक्षा जास्त धावा करणारा पहिलाच खेळाडू

**<u>मोदी-परिषद</u>**

व्यापार, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक भागिदारी वाढवून भारताच्या जागतिक सहभागाला बळकटी द्यावी असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. नवी दिल्लीत अकराव्या मिशन प्रमुखांच्या म्हणजे भारताच्या परदेशांमधील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या परिषदेला संबोधित करताना पंतप्रधान बोलत होते. 28 ते 30 एप्रिल दरम्यान परराष्ट्र मंत्रालयानं ही परिषद आयोजित केली होती. "2047 साठी भारतीय मुत्सद्देगिरीमध्ये परिवर्तन" या संकल्पनेवर ही परिषद केंद्रित होती. भारताच्या राष्ट्रीय हिताला परदेशात चालना देण्याबाबत मोदी यांनी या परिषदेत मार्गदर्शन केलं. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी उद्घाटनपर भाषण केलं. परिषदेत योग, विचारमंथन, आणीबाणी सदृश परिस्थिती हाताळण्यासंदर्भात चर्चा, विविध भू-राजकीय घडामोडी, उदयोन्मुख तंत्रज्ञान, भारताची भूमिका आणि भविष्यासाठी सज्ज मुत्सद्देगिरी यांसारख्या विषयांवर चर्चा झाल्या.

**<u>महाराष्ट्र दिन</u>**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा 67वा वर्धापन दिन आज महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. या निमित्तानं राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या निमित्ताने राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील शिवाजी पार्क इथ ध्वजवंदन होत आहे. राज्यभरात अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका आणि सामाजिक उपक्रमांद्वारे महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचा आणि प्रगतीचा गौरव केला जाणार आहे. महाराष्ट्र दिनाचं औचित्य साधून विविध प्रकल्पाचा प्रारंभही आज होणार आहे. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील महत्त्वाकांक्षी 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचं उद्घाटन आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. हा प्रकल्प मुंबई–पुणे प्रवास अधिक सुलभ, जलद आणि सुरक्षित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतुकीचा ताण कमी होऊन प्रवास अधिक सुरळीत होणार आहे.

**गुजरात स्थापना**

आज गुजरात स्थापना दिनही साजरा होत आहे. सुरतमध्ये त्या निमित्तानं विशेष संचलन होणार असून राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल उपस्थित राहणार आहेत. पोलिस तुकड्यांसह विशेष चित्ररथ आणि साहसी प्रात्यक्षिकंही त्यात होणार आहेत.

**ऑनलाइन गेमिंग**

ऑनलाइन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन नियम 2026, आजपासून लागू झाले आहेत. भारताच्या वेगानं विस्तारणाऱ्या ऑनलाइन गेमिंग क्षेत्राचं नियमन करण्याच्या दिशेनं उचललेलं हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. नशीब किंवा कौशल्य यांच्या आधारे पैशांनी खेळल्या जाणाऱ्या ऑनलाइन खेळांवर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. अशा प्लॅटफॉर्मशी संबंधित जाहिरात आणि आर्थिक व्यवहारांवरही बंदी घालण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं स्थापना केलेली ऑनलाइन गेमिंग समिती, नियामक म्हणून काम करेल. ऑनलाइन खेळांचं वर्गीकरण तसंच त्यांच्या वापरावर ही समिती देखरेख ठेवेल आणि वापरकर्त्यांच्या तक्रारींचं निवारण करेल, तसंच संबंधित संस्थांबरोबर समन्वय साधेल, असं सरकारनं म्हटलं आहे.

**बुद्धपौर्णिमा**

आज देशभर बुद्धपौर्णिमा साजरी केली जात आहे. भारतासह नेपाळ, भुतान, थायलंड, कोरिया, श्रीलंका अशा अनेक देशांमध्ये हा दिवस साजरा केला जातो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान बुद्ध यांचे करुणाभाव, अहिंसा, शांती आणि ज्ञानाबाबतचे संदेश संपूर्ण मानवतेला प्रेरणा देत राहतील असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. आज संपूर्ण जग वेगवेगळ्या आव्हानांचा सामना करत असताना भगवान बुद्ध यांची शिकवण प्रत्येकाला शांतता, सहिष्णूता आणि सद्भाव यांच्या मार्गावर जाण्याची प्रेरणा देत राहील असंही त्यांनी म्हटलं आहे. भगवान बुद्धांचे विचार साकार करण्याबाबत आपली कटिबद्धता मजबूत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज लेहमध्ये जिवेत्सल इथं बुद्धपौर्णिमेनिमित्त होणाऱ्या पवित्र अवशेष प्रदर्शनाचं उद्घाटन करणार आहेत. लेहमध्ये केंद्रीय बौद्ध अभ्यास संस्थेत प्रतिदिन दहा हजार लिटर्स क्षमतेच्या दुग्धोत्पादन संस्थेचं भूमिपूजनही ते करणार आहेत.

**शिवराजसिंह ग्रामसडक**

केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान आज ओडिशाच्या दौऱ्यावर आहेत. रायगाडा इथं आयोजित कार्यक्रमात ते प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या चौथ्या टप्प्याचं उद्घाटन करणार आहेत. या अंतर्गत ओडिशात एक हजार सहाशे 98 कोटी रुपये खर्चून एक हजार 701 किलोमीटरचे रस्ते तयार केले जाणार आहेत. त्यामुळे 8 हजार 98 वस्त्यांना पहिल्यांदाच शाळा, रुग्णालयं आणि बाजारपेठांसाठी रस्ते मिळणार आहेत.

**यूपीआय मोठा मंच**

एकात्मिक देयक आदानप्रदान मंच म्हणजे यूपीआय रिअल टाइम म्हणजे त्याच वेळी रकमांचं हस्तांतर करणारा जगातला सर्वांत मोठा मंच ठरला आहे. 11 एप्रिल 2016 ला सुरू झालेल्या यूपीआयमार्फत 2025-26 मध्ये 24 हजार 162 कोटी व्यवहार झाले आहेत. पहिल्या महिन्यात 373 व्यवहारांनी सुरू झालेल्या यूपीआय व्यवहारात तब्बल बारा हजार पट वाढ झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात यूपीआयमार्फत 314 लाख कोटी रुपयांचे

व्यवहार झाले आहेत. भारतात मासिक व्यवहार मार्च 2026 मध्ये 2 हजार 264 कोटी इतक्या उच्चांकी स्तरावर पोचले आहेत.

**<u>पश्चिम बंगाल निवडणुका</u>**

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी मतमोजणीदरम्यान केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना पर्यवेक्षक म्हणून नेमण्याला आव्हान देणारी तृणमूल कॉंग्रेसची याचिका कलकत्ता उच्च न्यायालयानं काल फेटाळून लावली. मतमोजणी पर्यवेक्षकांची नियुक्ती राज्य किंवा केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांमधून करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असल्याचा निर्वाळा न्यायमूर्ती कृष्णा राव यांनी दिला.

**<u>कैलास यात्रा सुरू</u>**

आदी कैलास यात्रा आजपासून उत्तराखंडमद्ये सुरू होत आहे. यात्रेकरूंना कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये यासाठी पिथोडगड प्रशासनानं सर्व प्रकारची सज्जता केली आहे. अंतर्गत परवाने जारी करण्यात आले असून, नोंदणी केलेले भाविक आखून दिलेल्या मार्गावरून मार्गक्रमणा करू शकतील. यात्रेकरूंची सुरक्षा आणि सुविधा यासाठी सर्व विभागांना सूचना दिल्याचं जिल्हाधिकारी आशिष भातगेन यांनी सांगितलं. दरम्यान, कैलास मानसरोवर यात्रा यंदा जून ते ऑगस्ट या काळात होणार आहे. उत्तराखंडमधल्या लिपुलेखमार्गे पन्नास यात्रेकरूंच्या दहा तुकड्या तर सिक्कीमधून नथु ला खिंडीमार्गेही पन्नास यात्रेकरूंच्या दहा तुकड्या सोडल्या जाणार आहेत. या यात्रेसाठी kmy.gov.in या संकेतस्थळामार्फत अर्ज मागवण्यास सुरुवात झाली आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. 19 मेपर्यंत अर्ज करता येणार आहेत.

**<u>आयपीएल</u>**

इंडियन प्रीमिअर लीग म्हणजे आयपीएलमध्ये विराट कोहलीनं एक विक्रम केला आहे. आयपीएलमध्ये आठ हजारपेक्षा जास्त धावा करणारा तो पहिलाच खेळाडू ठरला आहे. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाकडून खेळणाऱ्या विराटच्या यापूर्वी 231 सामन्यांमध्ये 7 हजार 988 धावा झाल्या होत्या. काल अहमदाबादमध्ये गुजरात टायटन्स संघाबरोबर झालेल्या सामन्यात तेरा चेंडूंमध्ये 28 धावा करून विक्रमाची नोंद केली. दरम्यान, या सामन्यात गुजरात टायटन्स संघानं रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुचा 4 गडी राखून पराभव केला. गुजरात टायटन्सने 25 चेंडू शिल्लक असतानाचं रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुनं ठेवलेलं 156 धावांचं उद्दिष्ट पार केलं.गुजरात टायटन्सचा जेसन होल्डर 2 बळींसह 3 झेल पकडून सामनावीर ठरला. आज संध्याकाळी जयपूर इथं, राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.